111

ISSN 2394-5303

GOLDEN JUBILEE YEAR
1967-2017

१९६६-२०१६
सुवर्ण महोत्सवी वर्ष

Printing Area
UGC
Jr.No.43053
UGC Approved Refereed Journal

श्री बालाजी संस्थान, देऊळगाव राजा द्वारा संचालित

## श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

देऊळगाव राजा, जि.बुलढाणा (महा.) पिन-४४३२०४

नॅक पुनर्मूल्यांकन 'ब++' दर्जा प्राप्त

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया (TM)

विशेषांक, डिसेंबर-२०१७

# भारतीय कृषिक्षेत्रासमोरील आव्हाने व संधी

IMPACT FACTOR 4.002 iijif

संपादक
प्रा.ज्ञानेश्वर विष्णू गोरे

www.vidyawarta.com

Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

112

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area™ International Research Journal | December 2017 Special Issue | 01

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

December 2017, Special Issue

श्री बालाजी संस्थान देऊळगाव राजा द्वारा संचालित

**श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

देऊळगाव राजा, जि. बुलडाणा. पिन-४४३ २०४.

नॅक पुनर्मूल्यांकन 'ब ++' दर्जा प्राप्त

# भारतीय कृषीक्षेत्रासमोरील आव्हाने व संधी

विशेषांक

मुख्य संपादक

**प्रा. ज्ञानेश्वर विष्णू गोरे**

प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,

श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

देऊळगाव राजा, जि. बुलडाणा.

ई-मेल : dvgore12@gmail.com, मोबाईल: ९१७५७१०३७५

डिसेंबर २०१७

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

for

Principal

Shri Shivaji Arts,Commerce

& Science College,Motala

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area™ International Research Journal | December 2017 Special Issue | 02

# संपादक मंडळ

**प्राचार्य डॉ. गजानन बी. जाधव**
मराठी विभाग प्रमुख, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा
**प्रा. ज्ञानेश्वर व्ही. गोरे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा
**प्रा. नरेन्द्र एच. शेगोकार**
वाणिज्य विभाग प्रमुख, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा
**प्रा. डॉ. सुधीरकुमार डी. चव्हाण**
इंग्रजी विभाग प्रमुख, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा
**प्रा. राजेंद्रसिंग एच. देवरे**
इतिहास विभाग प्रमुख, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा
**प्रा. डॉ. अनंत एम. आवटी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा
**प्रा. संदीप बी. जगताप**
वाणिज्य विभाग, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा
**प्रा. डॉ. विनोद आर. बन्सिले**
वाणिज्य विभाग, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा
**प्रा. डॉ. उमेश बी. देशमुख**
ग्रंथपाल, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा
**प्रा. मधुकर बी. जाधव**
मराठी विभाग, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा
**प्रा. डॉ. एकनाथ बी. भालेराव**
इंग्रजी विभाग, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा

Indexed

UGC Approved Journal
ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
Jr.No.43053

IMPACT 4.002 IIJIF FACTOR

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 3418002

**Note :** The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Printing Area' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

**http://www.printingarea.blogspot.com**



Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area™ International Research journal | December 2017 Special Issue | 08

40) भारतीय शेती समोरील आव्हाने : किटकनाशकांच्या वापरासंदर्भात
प्रा.डॉ.सुनिता कलाखे, जि. बुलडाणा. ||125

41) शेतक-यांच्या आत्महत्या : शेतकरी विरोधी कायदे
डॉ. विश्वनाथ कोक्कर औरंगाबाद. ||128

42) भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या
प्रा. दिलीप पांडुरंग महाजन, जि.बुलडाणा. ||132

43) जागतिक व्यापार संघटनेचे कृषी विषयक करार ..
कु. नीता ज्ञानदेव शिंदे, औरंगाबाद. ||136

44) नियोजन काळातील कृषी विकास
प्रा. डॉ. विष्णु बळीराम पवार, जि. अकोला ||139

45) भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या
प्रा. डॉ. गणेश हरिभाऊ घुगे, दुसरबिड ||141

46) शेती समस्येवर ठिबक सिंचन प्रभावी उपाय
डॉ.संगीता आर. धुंदले, औरंगाबाद. ||144

47) आनंदस्वामींच्या नेतृत्वातील बुलडाण्याचा शेतकरी विद्रोह —ई.स.१९३०
प्रा.संजय खरात, जि.बुलडाणा. ||146

48) भारतातील कृषी उत्पादनाच्या विपणनात सहकारी संस्थांची भूमिका
प्रा.डॉ. जयंत डि. पोरे, जि. बुलढाणा ||151

49) पश्चिम वैदर्भीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कारणे, परिणाम व उपाय
प्रा. एम. पी. चोपडे जि अकोला ||153

50) भारतीय कृषि क्षेत्रावर हवामान बदलाचा परिणाम
प्रा. सौ. हर्षदा एस.वाघोने, अकोला ||156

51) कृषी विकास व दारिद्रय निर्मूलन
पी. आर. चाटे, मोताळा. ||158

52) महाराष्ट्रातील जलसिंचनाचा अभ्यास
प्रा. पी. एस. मिसाळ, जि. जालना. ||161

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

निसर्गाकडून मिळालेला अमूल्य ठेवा आहे. मानवजातीच्या विकासामधला निसर्गाचे जतन व संवर्धन करणे हा ख—या अर्थाने आपल्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे. भारतातच नव्हे तर आज संपूर्ण जगात हवामान बदलाची समस्या प्रखरतेने जाणवत आहे.

वातावरणाच्या या बदलाचा हवामानावर व पर्यायाने मानवी आरोग्यावर घातक परिणाम होण्याची भिती जागतिक आरोग्य संघटनेद्वारे गठीत एका कार्यपथकाने व्यक्त केली आहे. हा परिणाम कमी करण्यासाठी साथीच्या रोगांवर नियंत्रण, रोगजंतुचा फैलाव करणा—या किटकांचा प्रसार रोखणे आवश्यक आहे. किंवा धुरांडयांची उंची वाढवून प्रदुषक उत्सर्जन वातावरणात उंचावर सोडल्यास जमिनीवरील प्रदुषण कमी करता येईल.

जागतिक तापमान वाढीचा हवामानात बदल झाल्यामुळे तापमान वातावरण, पर्जन्यमान या घटकांचा भारतीय कृषी क्षेत्रावर प्रभाव पडलेला असुन महाराष्ट्र व विदर्भातील पिक रचना थोडया फार प्रमाणात प्रभावीत झालेली दिसुन येते. मानवाचा निसर्गातील अतिहस्तक्षेप हवामान बदलास कारणीभूत ठरला आहे. औदयोगिक क्रांती, विज्ञान तंत्रज्ञानातील बदल हवामानातील बदलास कारणीभूत आहे.

संदर्भ :—


१. शेतकरी — महाराष्ट्र शासन कृषी विभाग
२. पर्यावरणशास्त्र — एरक भरूचा .
३. योजना जून २०१४ .
४. पर्यावरणशास्त्र — डॉ. विठठल धारपुरे .


❑❑❑

51

# कृषी विकास व दारिद्रय निर्मूलन


पी. आर. चाटे,
(सहा.प्राध्यापक) अर्थशास्त्र,
श्री.शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, मोताळा.


**********

**प्रस्तावना :—**

तामिळनाडू येथील महान संत तिरुवल्लर यांचे एक प्रसिध्द वचन आहे की, ''जो अन्नधान्य पिकवून इतरांना जगवतो त्यापुढे सर्व नतमस्तक असतात'' दोन हजार वर्षाअगोदरचे हे संत वचन भारतीय शेतीचे वास्तव वर्णन करते. मानवी जीवनात शेतीचे स्थान व त्यांचे समाजावर होणारे आर्थिक, सामाजिक परिणाम तितकेच महत्वपूर्ण आहेत. भारताचे राष्ट्रपीता महात्मा गांधी यांच्या विचारानुसार बुध्दी व श्रम यांच्यात फारकत झाल्यामुळे देशामधील शेती व्यवसाय विकलांग अथवा पंगू झाला आहे. भारतीय शेतीचा विकास शून्यातून वैभव निर्माण करणारा आहे. कारण १९६० पर्यंत भारत अन्नधान्याची आयात करणा—या देशांच्या पंक्तीमध्ये मोडायचा. परंतू आज अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता साध्य करुन जगामध्ये प्रमुख निर्यातदार देशांच्या बरोबरीने आपले स्थान बळकट करण्यात यशस्वी झाला आहे. भारत देशामध्ये जवळपास ६.०० लाख खेडी आहेत. त्याचप्रमाणे ६० ते ६५ टक्के जनता शेतीवर उदरनिर्वाहासाठी अवलंबून आहे. सकल राष्ट्रीय उत्पादनात शेती क्षेत्राचा २०१५—१६ नुसार वाटा १४.२ टक्के आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी कृषी क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. ग्रामीण भारताचा विकास, दारिद्रय निर्मूलन, बेरोजगारी, भूकबळी, बालमजूरी समानतेसह विकासाचे तत्व साध्य करण्यासाठी कृषी विकास महत्वपूर्ण उपाय आहे. शेती व ग्रामीण विकासासाठी



Principal
Shri Shivaji Arts,Commerce & Science College,Motala

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area™ International Research Journal | December 2017 Special Issue | 0159

जागतिकीकरणानंतर झालेले प्रयत्न काही अंशी दुर्लक्षित व सापत्र असल्याचे प्रकर्षाने जाणवते. कारण आपल्या देशामधील ८० टक्के शेतकरी हा अल्पभूधारक व सिमांत भूधारक या प्रकारात मोडतो. सिंचन सुविधेचा अभाव केवळ ४० टक्के सिंचनाचे प्रमाण, सुलतानी व असमानी संकटाचा फेरा, पायाभूत सोयी सुविधांची वानवा सार्वजनिक गुंतणूकीची कमतरता, बाजारभावाची साशंकता इत्यादी अनेक समस्यांनी भारतीय शेती क्षेत्र ग्रासलेले आहे.

भारतामधील शासनव्यवस्था जोपर्यंत शेती मध्ये प्रामाणिकपणे कायमस्वरुपी सुधारणा करणार नाही. तोपर्यंत भारताच्या बाबतीत राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय तज्ञ, संस्था, विचारवंत जो महासत्ता वा आर्थिक विकासाबद्दल अनुमान किंवा अंदाज बांधत आहेत त्यास कोणताही आधार नाही. कारण वास्तव परिस्थिती भीषण आहे.रोमन तत्ववेत्ता सेनेका यांच्या मतानुसार ''भूकेली जनता सबबी ऐकत नाही. कायद्याची पर्वा करत नाही आणि प्रार्थनांना जुमानत नाही.'' देशातील दारिद्र्याबाबत अनेक आंतरराष्ट्रीय संघटना, भारतातील अर्थतज्ञ, शासकीय संस्थांच्या अहवालामध्ये दारिद्र्यांची आकडेवारी भिन्न—भिन्न आहे. जागतिक बॅंकेच्या मतानुसार भारतातील दारिद्र्यांचे प्रमाण ६० टक्के च्या वर आहे. तसेच २००९ मध्ये सुरेश तेंडूलकर समितीने आपला अहवाल जाहिर केला. त्यामध्ये एकुण दारिद्र्यांचे प्रमाण ३७.२ टक्के होते. तर २०११—१२ च्या शासन अहवालानुसार भारतातील दारिद्र्याचे प्रमाण २१.९ टक्के होते. या विविध आकडेवारीवरुन दारिद्र्याची थट्टा तर नाही मांडली जात अशी शंका निर्माण होते. भारतामधील या सर्व समस्यांची सोडवणूक करण्यासाठी एकमात्र उपाय आहे व तो म्हणजे शेतीसह ग्रामीण भागांचा सर्वांगीण विकास या करता केवळ योजना, घोषणा याचा वापर करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर अधिक भर देणे अपेक्षित आहे. तेव्हा आपण चिरस्थायी विकास व भविष्यातील संकटे यांना समर्थपणे पेलण्यास तयार असू असे म्हणावे लागेल. अन्यथा ये रे माझ्या मागल्या या प्रमाणे देशातील जनतेची वाताहत झाल्याशिवाय राहणार नाही.

**शेतीविकास व दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाय**

**१. शेतीच्या क्षेत्रीय व दरडोई उत्पादकतेत वाढ करणे:**

शेती व दारिद्र्य यांचा परस्पर सहसंबंध आहे. भारत हा खंडप्राय देश आहे. त्यामुळे क्षेत्रीय शेती उत्पादन भिन्न—भिन्न आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक राज्यातील दारिद्र्याचा प्रश्न भिन्न—भिन्न आहे. त्याकरिता प्रत्येक क्षेत्रासाठी छोटे—छोटे क्षेत्रीय विकास प्रकल्प राबवुन उत्पादकतेत सुधारणा करता येवू शकते. ज्या प्रदेशामध्ये आवश्यक त्या वातावरणानुसार जे कृषी उत्पादन चांगले येते त्यास जास्त वाव देणे व त्याच ठिकाणी कृषी प्रक्रिया उद्योग उभे करण्यासाठी प्रोत्साहन व सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे त्यामुळे रोजगार निर्मिती व दारिद्र्य निर्मूलनासह शेती व्यवसायाला संपन्नता लाभेल. अनुत्पादक खर्चावर नियंत्रण आणण्यासाठी सर्वांगीण आर्थिक शिस्त व काटकसरीच्या तत्वाचा अवलंब करणे योग्य ठरते. त्याचबरोबर गरजेची तीव्रता व आवश्यकता हया बाबींचा विचार करुन खर्च करणे महत्वाचे ठरते.

**२. अनुत्पादक खर्चासह उत्पादन खर्चावर नियंत्रण:**

केवळ शेतकरी वर्गच अनुत्पादक खर्च करतो असे नाही. तर त्यासह शेतमजूर, भूमीहीन व सोबतच अल्प उत्पन्न असणारा वर्ग असंख्य प्रकारच्या अनावश्यक रुढी, परंपरांवर खर्च करतात. त्याचा परिपाक अवास्तव खर्चात वाढ होवून दारिद्र्यात खितपत पडण्यासाठी या गोष्टींची हातभार लागतो. तसेच शेतकरी वर्ग अधिक—अधिक उत्पादनात वाढ घडून आणण्याच्या उद्देशाने गरज नसतांना अज्ञानापायी अनावश्यक खर्च करतो. त्यासाठी दारिद्र्याच्या दुष्टचक्राप्रमाणे 'तो गरीब आहे कारण तो मुळातच गरीब आहे.''

**३. विकास कार्यक्रमांची कृतीपूर्ण अंमलबजावणी:**

भारत स्वातंत्र्य झाल्यापासून आज ७० वर्षा मध्ये ग्रामीण भागाच्या उन्नतीसाठीच्या व शेती सुधारणेच्या योजनांची एक शिडी, बनवली तर स्वर्गापर्यंत पोहचू इतक्या योजनांच्या पाय—या तयार होतील. त्यासाठी कृतीशील व भ्रष्टाचारमुक्त योजनांची आवश्यकता आहे. कारण योजनेपेक्षा उपयुक्त अंमलबजावणी अधिक महत्वाची असते.

**४. देशाचा व शेतीचा मागासलेपणा दुर करणे:**



Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Sc...

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area™ International Research journal | December 2017 Special Issue | 0160

भारतात आजसुध्दा निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या कृषीक्षेत्रावर अवलुंबून असते. त्यामध्ये शेती उत्पादन, शेतमालांच्या किंमती तसेच नैसर्गिक लहरीपणा या सर्व समस्यांमुळे शेतकरी अधिक संकटात सापडतो. देशातील इतर क्षेत्राचा विकास झाला पण तो रोजगारविहिन झालेला आहे किंवा कुशल रोजगार देण्यासाठी देशाचे धोरण अपयशी ठरले असे म्हणावे लागेल. स्वातंत्र्याच्या ७० वर्षांच्या कालावधीत आजही ग्रामीण भागातील रस्ते, वीज, पाणी याच मुद्दयांवर चर्चा होते.

**५. सामाजिक रुढी, परंपरा व जाती व्यवस्थेला तिलांजली देणे:**

भारतीय समाजव्यवस्था व जातीव्यवस्थेची पाळेमुळे आजही घट्ट रोवलेली दिसून येतात. यातुन बाहेर निघण्याचा एकमेव मंत्र म्हणजे आर्थिक संपन्नता कारण तुमच्या आर्थिक संपन्नतेतून जातीव्यवस्थेला दूर सारता येते. विविध धार्मिक संस्कार, रुढी, परंपरा, हुंडा, श्राध्द अशा अनेक गोष्टींवर विनासायास पैशाचा अपव्यय होतो. त्यासाठी सावकाराकडून वेळप्रसंगी कर्ज घेतले जाते. या सर्व बाबीला छेद दिल्यास संपन्न व सुखी समाज निर्माण होवू शकतो.

**६. दळणवळणाच्या व गोदाम व्यवस्थेच्या चांगल्या सोयी—सुविधा पुरविणे:**

आज भारत देशामध्ये ग्रामीण भागात दळणवळणाच्या सुविधेबाबत कठीण परिस्थिती आहे. शेतमाल साठवणूकीची अपुरी सोय त्यामुळे शेतक—यांना उत्पादनमाल कमी किंमतीला विकावा लागतो. मागील दोन वर्षाची स्थिती २०१५—१६ व २०१६—१७ ही विपूलतेत दारिद्रिय असल्याची स्थिती दर्शविते. सर्व प्रकारातील दळणवळणाची असमाधानकारक स्थिती ही देशामधील शासनकर्त्याचीच दुटप्पी भूमिका आहे हे स्पष्ट करते. दळणवळणाच्या चांगल्या सोयी सुविधा पुरवून शेती विकासाला व दारिद्रिय उपशमन करण्याला एक प्रकारे हातभार लागू शकतो. त्याचप्रमाणे अन्नधान्य नासाडी व उपासमारीचा प्रश्न दूर करण्यास मदत होईल.

**७. अधिकोष व पतपुरवठ्याची सोयी विकसीत करणे:**

शेतक—यांना वर्तमानकाळात कोरडवाहू व बागायतदार या वर्गीकरणातून पतपुरवठा होतांना दिसतो. केवळ भारतात ४० टक्के सिंचन व्यवस्था असल्यामुळे उर्वरीत शेतक—यांना पुरेशा प्रमाणात कर्जसुविधा उपलब्ध होत नाही. त्यासाठी शेतक—यांना योग्य माहितीसह व विनासायास आवश्यक तेवढा कर्जपुरवठा होणे गरजेचे आहे. आज तरल तारणाशिवय पतसंस्था व अधिकोष यंत्रणा कर्जसुविधा देत नाही. याकरिता शासनाने पुढाकार घेवून योग्य तो मार्ग काढणे व शेतक—यांमध्ये कर्ज सुविधा बाबत व परतफेडीबाबत जाणीव जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात आजसुध्दा बॅंका व पतसंस्थांचा पुरेसा विकास झाला नाही. म्हणून कृषीपुरक उद्योग व शेतीविकासाला खिळ बसल्याचे दिसते.

**८. लोकसंख्या नियंत्रण:**

जगतिक पातळीवर आपल्या देशामधील लोकसंख्येच्या प्रश्नाबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. आपल्या देशात आज ज्या काही समस्या निर्माण झाल्या त्या सर्व समस्यांची जननी फक्त बेसुमार वाढलेली लोकसंख्या होय. प्रचंड लोकसंख्येचा विस्फोट झाला असतांना सुध्दा या विषयी गंभीरपणे विचार करण्यास शासनव्यवस्था तत्पर दिसत नाही. जाणीवजागृती मध्ये पण आपण कमी पडतो. या देशात असंख्य जाती धर्माचे लोक एकत्र नांदतात. घटना सर्वोच्च असून शासन निर्णय सर्वांना मान्य असतो. तरी सुध्दा लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी यशस्वी प्रयत्न करण्यासाठी आपण अपयशी ठरल्याचे जाणवते. आज ग्रामीण भागात इतरत्र शहरी—निमशहरी भागात भरमसाट वाढलेल्या लोकसंख्येमुळे असंख्य समस्या निर्माण झाल्या आहेत. ग्रामीण भारताचा विकास व दारिद्रियनिर्मुलन करण्यासाठी सर्व पक्षांना, सर्व धर्मांना मान्य असेल असा सर्वसामान्य कार्यक्रम लागू करण्याची वेळ आली आहे. प्रौढ शिक्षण, लोकसंख्या शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण व शंभर टक्के साक्षरता ह्या गोष्टीवर लक्ष केंद्रित केल्याने योग्य मार्ग मिळू शकतो.

**९. रोजगार निर्मिती व बेकारी कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावे:**

भारतात लोकसंख्येच्या मानाने आवश्यक तेवढा



Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area™ International Research journal | December 2017 Special Issue | 0161

रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे प्रभावी मागणीत वाढ होत नाही. मागील १२ पंचवार्षिक योजनांच्या अभ्यासावरुन हे लक्षात येते की मोठया व मध्यम उद्योगात उच्च व मध्यमवर्गीयांना उपयोगात असणा—या वस्तूचेच उत्पादन करण्यात येते. त्यामुळे दारिद्रियाचा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी ग्रामीण भागाशी नाळ जोडून असणा—या लघु व कुटिर उद्योग, कशषी उद्योग, कृषी पुरक व्यवसाय, ग्राम उद्योग, बचत गटांच्या सहाय्याने चालणारे छोटे—मोठे उद्योग यांच्यावर जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. कारण या सर्व गोष्टींमुळे ग्रामीण भागातील शेतीवरचा अतिरिक्त बोजा कमी होवून दारिद्रय निर्मुलन होण्यास जास्त लाभ होईल.

भारताचा चिरस्थायी विकास करण्यासाठी ग्रामीण भागावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. म्हणून उत्पादकता वाढविणे, उत्पादन खर्चात घट, रोजगार सृजन, दळणवळण सोयी सुविधा, सामाजिक रुढी परंपरा या सर्वांवर डोळसपणे लक्ष देवून धोरणांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यावेळेस वास्तविक भारत देश महासत्ता म्हणून उदयाला येवू शकतो.

**संदर्भ ग्रंथ :**


१. भारतीय अर्थव्यवस्था — दत्त व सुंदरम्

२. भारत २०२० नव्या सहस्रकाचा भविष्य वेध— डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम .

३. भारतीय अर्थव्यवस्था — डॉ.जी.एन.झामरे

४. स्वामीनाथन : भूकमुक्तीचा ध्यास — अतुल देऊळगावकर .

५. विश्वाचे आर्त — अतुल देऊळगावकर

६. युनिक बुलेटिन — नोव्हेंबर २०१३ .

७. चाणक्य मंडल मासिक — ऑगस्ट २०१७

८. कुरुक्षेत्र — ऑगस्ट २०१६ .


❑❑❑

**52**

# महाराष्ट्रातील जलसिंचनाचा अभ्यास


**प्रा. पी. एस. मिसाळ,**

सहाय्यक प्राध्यापक

मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भोकरदन, जि. जालना.


***********

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था कृषी प्रधान असुन आजही अर्ध्यापेक्षा जास्त लोकसंख्येचा उदरनिर्वाह कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. कोणत्याही राज्याच्या किंबहुना देशाच्या विकासाच्या दृष्टीने कृषी क्षेत्राला खुप महत्वाचे स्थान असते कारण अर्थव्यवस्था जरी विकासाच्या कितीही उच्च पातळीवर पोहचली तरी त्या अर्थव्यवस्थेला अन्नधान्य आणि कच्चा माल यासाठी कृषी क्षेत्राशिवाय पर्याय नाही हे सत्य कोनालाही लपवता येणार नाही. कृषी क्षेत्राच्या विकासाशिवाय राज्याच्या किंबहुना देशाच्या विकासाची कल्पना करणे म्हणजे वाळवंटातील मृगजळ शोधण्यासारखे होईल. कृषी क्षेत्राचा विकास हा संस्थात्मक आणि तंत्रात्मक सुधारणांवर अवलंबून असतो. तंत्रात्मक सुधारणांतर्गत सिंचनासाठी पाणी, खते, सुधारित बि-बियाणे, आधुनिक कृषी अवजारे इ.मोठया प्रमाणात आणि रास्त किंमतीमध्ये उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. कृषी क्षेत्रातील उत्पादन, उत्पन्न, उत्पादकता आणि रोजगार वाढीच्या दृष्टीने पाणी हा अतिशय महत्वाचा घटक आहे. अलिकडील काळात पर्जन्याची अनिश्चितता, वाढते तापमान, वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकिकरण यामुळे पाण्याची उपलब्धता आणि वापर यातील तुट वाढत आहे. कृषीक्षेत्रासाठी उपलब्ध होणारे पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यामुळे जलसिंचनासाठी पाण्याचा वापर काटकसरीने आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहय्याने करणे आवश्यक आहे. या पार्श्वभुमीवर कृषी जलसिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढावी म्हणुन पावसाच्या प्रत्येक थेंबाचा संचय, संवर्धन आणि नियोजन करणे तसेच जलसिंचनाच्या आधुनिक पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

**उद्दीष्टये व संशोधन पद्धती:**

१. जलसिंचनाचे महत्त्व आणि जलसिंचन स्त्रोतांचा अभ्यास करणे.



Principal
Shri Shivaji Arts,Commerce & Science College,Motala

Shri Balaji Sansthan Deulgaon Raja's

# SHRI VYANKATESH ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE

Deulgaon Raja, Dist. Buldana

NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

GOLDEN JUBILEE YEAR
1967-2017
1966-2016
सुवर्ण महोत्सवी वर्ष

ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE

ON

## Indian Agriculture: Challenges and Opportunities

ORGANIZED BY

DEPARTMENT OF ECONOMICS






# Certificate

This is to certify that,

*Mr. Purushottam R. Chate, Assistant Professor & Head, Department of Economics, Shri Shivaji Arts, Commerce & Science College, Motala, Dist. Buldana (MS)* attended the One Day Interdisciplinary National Conference on "*Indian Agriculture: Challenges and Opportunities*" and participated in the deliberations on 23rd December, 2017.

He also presented a research paper.

Place : Deulgaon Raja

Date : 23rd December, 2017

| | |
|---|---|
| Coordinator<br>(Prof. Dnyaneshwar Gore) | Convener<br>(Prin.Dr. Gajanan Jadhav) |